ePaper **खोकेवाले गद्दार म्हणत... आदित्य ठाकरेंचा शिंदे गटावर हल्लाबोल**



| वर्ष - 6 | अंक - 177 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार | दिनांक 9 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- तीन महिन्यांपूर्वी जो कार्यक्रम केला तो जनतेच्या हितासाठी
- चिखली येथील प्रस्तावित हॉस्पिटलला मुख्यमंत्र्यांचा "ग्रीन सिग्नल"
- "खोकेवाल्या गद्दारांनी...," आदित्य ठाकरेंचा शिंदे गटावर हल्लाबोल

### मुख्यमंत्री- विरोधी पक्षनेते एकाच दिवशी शहरात दाखल, प्रशासनाची धावपळ

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'हाय होल्टेज पॉलिटिकल डे'!

## आमदार लांडगेंच्या भेटीला एकनाथ शिंदे अन् अजित पवार महापालिकेतील बैठकीला





**| पिंपरी-चिंचवड |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**पिंपरी-चिंचवडकरांचा शनिवारचा दिवस 'हाय होल्टेज पॉलिटिकल डे' ठरला. राज्याचे मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते एकाच दिवशी शहराच्या दौऱ्यावर आल्यामुळे प्रशासनाची चांगलीच धावपळ झाली. तसेच, राजकीय वर्तुळात चर्चा रंगलेली पहायला मिळाली.**

सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून 'संवाद सोसायटीधारकांशी' असा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यानिमित्ताने राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांना मैदानात उतरवण्यात आले होते. त्यानंतर आज अजित पवार यांनी महापालिकेत अचानक भेट दिली. यावेळी प्रशासक आणि आयुक्त शेखर सिंह यांच्यासह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. तसेच, सोसायटीधारकांच्या समस्यांचा प्रस्ताव सादर करुन प्रश्न मार्गी लावण्याबाबत मागणी करण्यात आली. दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष महेश लांडगे यांच्या निवासस्थानी भेट दिली. आमदार लांडगे यांना दि. २४ सप्टेंबर रोजी मातृशोक झाला. त्यानिमित्त सांत्वन करण्यासाठी शिंदे भोसरीत दाखल झाले होते. नाशिक येथील बस अपघातानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी जखमी नागरिकांची भेट घेतली. त्यानंतर शिंदे पिंपरी-चिंचवडमध्ये आले होते. सोसायटीधारकांच्या समस्यांवरून भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी असा राजकीय संघर्ष पेटला होता. एकनाथ शिंदे यांनी सोसायटीधारकांचा पुळका राष्ट्रवादीला राजकीय हेतूने आला असून, २० वर्षे सत्तेत असताना समाविष्ट गावांसह सोसायटीधारकांकडे राष्ट्रवादीने दुर्लक्ष केले, असा आरोप केला होता. तर राष्ट्रवादीचे प्रवक्ते विनायक रणसुंबे यांनी भाजपाच्या पाच वर्षांच्या सत्ताकाळात सोसायटीधारकांचे प्रश्न सुटले नाहीत. एकनाथ पवार यांचे सोसायटीधारकांसाठी योगदान काय? असा प्रतिहल्ला केला होता.

### आमदार लांडगे यांचा राजकीय परीघ वाढतोय...

भाजपाचे आमदार महेश लांडगे यांना मातृशोकानंतर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह राज्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी शोकसंदेश दिला आणि सांत्वन केले. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते अजित पवार, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह आमदार, खासदार यांनी प्रत्यक्ष भेट घेतली. नगरसेवक, स्थायी समिती सभापती, आमदार आणि भाजपा शहराध्यक्ष असा यशस्वी राजकीय प्रवास करणारे आमदार महेश लांडगे यांचा राजकीय परीघ आता वाढलेला दिसत आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# वल्लभनगर बस स्थानकावरील खड्डे 2 दिवसात बुजवले!

## राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे यांची तत्परता

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी |**

वल्लभनगर आगार व्यवस्थापक यांनी पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे यांना वल्लभनगर बस स्थानकावरील खड्डे व दुरावस्थे बाबत तसेच निगडी बुकिंग ऑफिस बद्दल निवेदन दिले होते.आमदार अण्णा बनसोडे यांनी आपल्या संपूर्ण टीम सह लागलीच दुसऱ्याच दिवशी वल्लभनगर बस स्थानकाला व आगाराला भेट दिली. वल्लभनगर बस स्थानक आवारात भले मोठे खड्डे असल्याने प्रवासी,चालक,वाहक यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. ही बाब त्यांच्या लक्षात आली व त्याच दिवशी सिमेंट कॉंक्रेट ची गाडी बोलावून सर्व खड्डे बुजवण्याचे आदेश दिले.कार्यालयीन कामकाजाच्या फक्त दोनच दिवसात खड्डे बुजवल्यामुळे आमदार अण्णा बनसोडे यांच्या कार्य तत्परतेची चर्चा संपूर्ण आगारात व शहरात झाली आहे.



वल्लभनगर बसस्थानकाच्या आगार प्रमुख श्रीमती स्वाती बांद्रे यांच्या सोबत संपूर्ण वल्लभनगर बस स्थानक व आगराची पाहणी आमदार अण्णा बनसोडे यांनी केली.बस स्थानका वरील फलाटाचे कठडे मोडकळीस आलेले आहेत.बस स्थानक आवारात डांबरीकरण व कॉंक्रेटिकरण नसल्याने सर्व दूर धुळीचे साम्राज्य आहे. ड्रेनेज लाइन बुजून गेल्याने पावसाळ्यात पाणी वाहून न जाता बस स्थानक परिसरात जमा होते.तसेच बस स्थानकाची इमारत ही 24 वर्षे जुनी असल्याने काही ठिकाणी स्लॅब देखील खचलेला आहे.ही सर्व दुरावस्था पहिल्या नंतर आमदार अण्णा बनसोडे यांनी बस स्थानक व आगराचे पुनर्विकास करण्याबाबत प्रशासकीय स्तरावरून पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. तसेच येत्या महिना भरात निगडी बुकिंग ऑफिस येथे स्थानिक आमदार विकास निधीमधून टॉयलेट बाथरूम बांधून देणार असल्याचे देखील सांगितले.व जे खड्डे आहेत ते 2 दिवसात भरून देतो बोलले .

> **"बस स्थानकाची डागडुजी,तसेच खड्डे भरून देण्याचे काम पुणे मेट्रो यांच्या वतीने करून देण्यात येईल असे आम्हाला सांगीतले होते मात्र मेट्रो कडे सतत पाठपुरावा करून देखील खड्डे बुजवण्याचे काम करण्यास मेट्रो टाळाटाळ करत होते.अखेरीस आम्ही ही बाब आमदार अण्णा बनसोडे यांना पत्राद्वारे कळवली व त्याच्या दुसऱ्याच दिवशी आमदार अण्णा बनसोडे यांनी बस स्थानकाची पाहणी करून खड्डे बुजवण्याचे काम तात्काळ पूर्ण करून दिले त्याबद्दल आगार प्रमुख या नात्याने मी त्यांचे आभार मानते.**
> **- श्रीमती स्वाती बांद्रे (वल्लभनगर आगार व्यवस्थापक)**

# तीन महिन्यांपूर्वी जो कार्यक्रम केला तो जनतेच्या हितासाठी

## शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचं नाव न घेता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला टोला

।पुणे ।महाईन्यूज।



तीन महिन्यांपूर्वी आम्ही जो कार्यक्रम (बंड) केला तो जनतेच्या हितासाठी केला आहे. चांगले वाईट विचारांचे लोक असतात पण आपण त्याची परवा करायची नसते चांगला काम करत राहायचं अस म्हणत शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचं नाव न घेता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टोला लगावला आहे. ते आळंदीत मृदंगज्ञान या संस्थेच्या कार्यक्रमात बोलत होते. वारकरी हे महाराष्ट्रच वैभव आहे. वारकरी संप्रदाय एक मोठी शक्ती, ताकद आहे असं देखील त्यांनी नमूद केलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले " महाराष्ट्राला अलौकिक अशी संत परंपरा लाभलेली आहे. कुठल्या क्षेत्राला, प्रांताला असं भाग्य लाभलेलं नाही. यामुळे देशात महाराष्ट्राला वेगळं स्थान आहे. तुम्ही आम्ही भाग्यवान आहोत. वारकरी संप्रदायात एक मोठी शक्ती आहे, ताकद आहे. वारकरी संप्रदायात भजन, कीर्तन याला मोठं स्थान आहे. धावपळीच्या जीवनात थोडावेळ का होईना पांडुरंगाचं नामस्मरण करतो. त्यामुळं आपल्याला मानसिक समाधान मिळतं. ऊर्जा मिळते डोक्यात सकारात्मक विचार येतात. माणूस म्हटलं की राग, मत्सर, लोभ येतो. त्यामुळं स्पर्धा निर्माण होते. स्पर्धा असावी परंतु लोकांच्या हिताला प्राधान्य देणारी असावी. मला काहीतरी मिळवायचं आहे म्हणून स्पर्धा नको. आम्ही जो तीन महिन्यांपूर्वी कार्यक्रम (बंड) केला तो जनतेच्या हितासाठी केलेला आहे. चांगलं काम करत राहायचं". शिंदेंच्या भाषणादरम्यान इंद्रायणी स्वच्छ करण्याची मागणी एका वारकऱ्याने केली असता इंद्रायणी स्वच्छ करण्याबाबत संबंधित प्रशासनाला सूचना देण्यात येतील असे ते म्हणाले.

## मराठा आणि इंग्रजांतील लढाईला इंग्लडच्या शिष्टमंडळ भेटीने उजाळा

पुणे : कार्ला येथे इंग्रज आणि मराठ्यांमध्ये ४ जानेवारी १७७९ मध्ये झालेल्या लढाईत इंग्रजांचा पराभव झाला होता. इंग्रज सेनापती स्टुअर्ट फाकड्डा या लढाईत मारला गेल्याची नोंद इतिहासात आहे. या सर्व घटनांची नोंद इंग्लंडच्या दप्तरीही आहे. त्याचीच प्रत्यक्ष भेटीत माहिती घेण्यासाठी इंग्लड येथील शिष्टमंडळाने ऐतिहासिक कार्ला नगरीला भेट दिली. त्यावेळी लढाईच्या घटनेला उजडाळा मिळाला. इंग्रज



आणि मराठा सैनिकांमध्ये कार्ला येथे झालेल्या लढाईत मारला गेलेल्या स्टुअर्ड फाकड्याचा एक स्तंभ कार्ला येथे आहे. इंग्लड येथील पंधरा जणांच्या शिष्टमंडळाने कार्ला परिसराला भेट देऊन या ऐतिहासिक घटनेविषयीची माहिती घेतली. इतिहासाचे अभ्यासक नितीन शास्त्री यांनी शिष्टमंडळाला याबाबतची माहिती दिली. इंग्रजांबरोबर झालेली सर्वात मोठी लढाई आणि त्यात मराठा सैनिकांनी मिळविलेला सर्वात मोठा विजय कायम स्मरणात रहावा, यासाठी संबंधित ठिकाणी उभा राहत असलेल्या विजयस्तंभाविषयीची माहितीही शास्त्री यांनी शिष्टमंडळाला दिली.इंग्लडमधील अभ्यासकांच्या या शिष्टमंडळात इंग्लडच्या सैन्यातील निवृत्त कर्नल पॅट्रीक्स यांचाही समावेश होता. कार्ला ग्रामपंचायतीचे माजी सदस्य भाऊसाहेब हुलावळे यांनी शिष्टमंडळाचे स्वागत केले. या ऐतिहासिक स्थळावर दरवर्षी मराठा सैनिकांच्या विजयाची आठवण म्हणून विजयदिन साजरा केला जात असल्याचेही त्यांनी शिष्टमंडळाला सांगितले.

## तुटपुंजी मदत केल्याचा आरोप करत अजित पवारांची शिंदे सरकारवर टीका!

### “नाशिक अपघातात बळी पडलेल्या निष्पाप नागरिकांचा काहीही दोष नव्हता

।पुणे। महाईन्यूज ।



पहाटे नाशिक – औरंगाबाद रस्त्यावर झालेल्या भीषण अपघातामध्ये एका खासगी बसला लागलेल्या आगाती १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला आहे. डंपर-खासगी बसच्या अपघातानंतर देशभरातून हळहळ व्यक्त होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहांबरोबरच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि विरोधी पक्षनेते अजित पवार यांनीही या दुर्घटनेबद्दल खेद व्यक्त केला आहे. या अपघातामधील मृतांच्या नातेवाईकांसाठी राज्य सरकार आणि केंद्र सरकारने आर्थिक मदतीची घोषणा केली आहे. मात्र राज्य सरकारने केलेली मदत ही पुरेशी नसल्याची टीका विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली आहे. पिंपरीमध्ये पत्रकारांशी बोलताना अजित पवारांनी हे मत व्यक्त केलं.

नाशिकमधील बस अपघातात मृत्यू झालेल्यांच्या नातेवाईकांना राज्य सरकारने प्रत्येकी पाच लाख रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री कार्यालयाच्या ट्वीटर हॅण्डलवरुन, “नाशिक- नांदूरनाका येथे खाजगी बसच्या भीषण अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाला असून या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र दुख व्यक्त केले आहे. या दुर्दैवी घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना ५ लाख रुपयांची मदत शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आली आहे,” असं सांगण्यात आलं आहे. या अपघातातील जखमींवर शासकीय खर्चाने तातडीचे वैद्यकीय उपचार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. नाशिक येथील अपघाताच्या कारणांचा शोध घेतला जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. अजित पवार यांनीही ट्वीटरवरुन, “यवतमाळहून मुंबईच्या दिशेनं येणाऱ्या खासगी बसला औरंगाबाद-नाशिक मार्गावर अपघात होऊन प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना दुर्दैवी आहे. मृत्यू पावलेल्या प्रवाशांना भावपूर्ण श्रद्धांजली! त्यांच्या नातेवाईकांच्या दुखात आम्ही सर्व सहभागी आहोत,” असं म्हटलं आहे. त्याचप्रमाणे त्यांनी, “अपघातातील जखमींना वैद्यकीय उपचार व मृतांच्या नातेवाईकांना सरकारनं आर्थिक मदत करावी. अशा अपघातांची पुनरावृत्ती व प्रवाशांचे मृत्यू टाळण्यासाठी ठोस पावलं उचलण्याची गरज आहे,” अशीही अपेक्षा व्यक्त केली

## जिल्ह्यातील २२१ ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया सुरू



।पुणे। महाईन्यूज ।

ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत मुदत संपणाऱ्या आणि नव्याने स्थापन होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत. जिल्ह्यात अशा २२१ ग्रामपंचायती असून त्यांची निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. या ग्रामपंचायतींच्या प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्यात येणार आहेत.

या निवडणुकांसाठी संगणकप्रणालीद्वारे प्रभागनिहाय मतदार यादी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी १३ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर १८ ऑक्टोबरपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. अंतिम मतदार यादी २१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील २८, भोरमधील ५४, दौंडमधील आठ, बारामतीमधील १३, इंदापुरातील २६, जुन्नरमधील १७, आंबेगावमधील २१, खेडमधील २३, शिरूरमधील चार, मावळातील नऊ, मुळशीतील ११ आणि हवेलीतील सात अशा एकूण २२१ ग्रामपंचायतींचा समावेश आहे, असे जिल्हा ग्रामपंचायत शाखेकडून सांगण्यात आले.

## वन विभागाच्या जागा हस्तांतरण मागणीला सकारात्मक प्रतिसाद

# चिखली येथील प्रस्तावित हॉस्पिटलला मुख्यमंत्र्यांचा "ग्रीन सिग्नल"!

## भाजपाचे माजी नगरसेवक कुंदन गायकवाड यांचे निवेदन

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**चिखली परिसरातील वन विभागाच्या जागेचा ताबा प्रस्तावित हॉस्पिटलसाठी महापालिका प्रशासनाकडे देणेबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक आश्वासन दिले आहे. त्यामुळे समाविष्ट गावात आणखी एक मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. चिखलीतील प्रस्तवित रुग्णालयाच्या जागेसाठी वन विभागाने ताबा द्यावा. यासाठी भाजपाचे माजी नगरसेवक कुंदन गायकवाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले.**



या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत समावेश झाल्यापासून चिखली आणि परिसरात मोठ्याप्रमाणात नागरीकरण वाढले आहे. वाढत्या नागरीकरणाच्या दृष्टीने या भागात शासकीय आरोग्य सुविधा अद्याप सक्षम नाहीत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना उपचारांसाठी महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अथवा अन्य रुग्णालयांकडे धावाधाव करावी लागते.

> या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत समावेश झाल्यापासून चिखली आणि परिसरात मोठ्याप्रमाणात नागरीकरण वाढले आहे. वाढत्या नागरीकरणाच्या दृष्टीने या भागात शासकीय आरोग्य सुविधा अद्याप सक्षम नाहीत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना उपचारांसाठी महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अथवा अन्य रुग्णालयांकडे धावाधाव करावी लागते.

दरम्यान, चिखली येथे वन विभागाच्या हद्दीतील गट क्रमांक 1653 मध्ये सुमारे 20.22 हेक्टर जागेचा ताबा महापालिका प्रशासनाला मिळाल्यास या ठिकाणी प्रशस्त रुग्णालय उभारता येईल. याबाबत सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, वन विभागाकडून जागेचा ताबा महापालिका प्रशासनाला मिळणे अपेक्षीत आहे.

सध्या 'वायसीएम' रुग्णालयात पिंपरी-चिंचवडसह लगतच्या मुळशी, मावळ, खेड, जुन्नर, आंबेगाव, शिरूर या तालुक्यांसह अन्य जिल्ह्यातील रुग्णही उपचारासाठी येतात. तुलनेने खेड, जुन्नर, आंबेगाव, मावळ तालुक्यातील रुग्णांची संख्या जास्त आहे. त्याचा ताण 'वायसीएम'वर येत आहे. त्यातील उपलब्ध मनुष्यबळ आणि विस्तार क्षमतेला मर्यादा आहेत. त्यामुळे वायसीएमला पर्यायी वैद्यकीय व्यवस्था उभी करणे पिंपरी-चिंचवडसह समाविष्ट गावांसाठी अत्यावश्यक आहे.

त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा म्हणून चिखलीत तात्काळ रुग्णालय सुरू करणेकामी वन विभागाच्या ताब्यातील जागा महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरीत करावी. व त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे आदेश द्यावेत, अशी मागणीही कुंदन गायकवाड यांनी केली आहे.

---

## "एक व्यक्ती, एक पद" फॉर्म्युलामुळे

# काँग्रेसच्या शहराध्यक्षांचे पद धोक्यात?

## पिंपरी चिंचवड शहर पातळीवर वाजू लागली धोक्याची घंटा

**पुणे। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**एकीकडे काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत एक व्यक्ती, एक पद' हा फॉर्म्युला अस्तित्वात आला आहे. यामुळे पिंपरी चिंचवड शहर पातळीवर यामुळे धोक्याची घंटा वाजू लागली आहे. विद्यमान शहराध्यक्ष कैलास कदम यांच्याकडे चार पदे असून हा फॉर्म्युला शहरातही लावण्याच्या हालचालींना वेग आला आहे. एक व्यक्ती, एक पद' असावी अशी तक्रार थेट वरिष्ठांकडे करण्यात आली आहे. यामुळे कैलास कदम याच्याकडील शहर काँग्रेस अध्यक्ष बदलाच्या चर्चांनी जोर धरला आहे.**





पक्षांतर्गत गटबाजीने काँग्रेसला आतून पोखरले असताना पुन्हा शहराध्यक्ष पदासाठी इच्छुकांमध्ये चढाओढ लागली आहे. पक्षाची स्थानिक पातळीवर वाताहत सुरू असताना वरिष्ठ स्तरावरून पुन्हा कार्यकर्त्यांमध्ये वाद लावून देण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. राज्य पातळीवर 'एक व्यक्ती एक पद' पॉलिसी आणली जाते तर दुसरीकडे शहरात एकाच व्यक्तीकडे चार-चार पदाचा कार्यभार दिला जातो. याविरोधात पक्षातील कार्यकर्त्यांनी यामुळे काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम यांचे पद जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.तत्कालीन अध्यक्ष सचिन साठे यांच्यानंतर काँग्रेसच्या शहराध्यक्ष पदावरून निर्माण झालेल्या वादात पक्ष रसातळाला गेला होता. वाद घालण्या-यांनी पक्षवाढीचा विचार न करता स्वतःला अधिकार कसे मिळतील, यासाठीच वेळ खर्ची घातला. त्यांच्या स्वार्थी राजकारणामुळे पिंपरी चिंचवड शहरातील कार्यकर्त्यांची घडी विस्कटली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शहराध्यक्ष पदाची जबाबदारी कामगार नेते तथा माजी नगरसेवक कैलास कदम यांच्या वरती देण्यात आली. आता कदम यांच्या शहराध्यक्ष पदावरून नवा वाद निर्माण झाला आहे. एक व्यक्ती एक पद या पॉलिसीनुसार एका व्यक्तिकडे एकापेक्षा अधिक पदाचे अधिकार देण्यास प्रतिबंध घातले आहेत. तरीही कदम यांच्याकडे चार विविध पदांचे अधिकार देण्यात आले. आहेत. त्यांच्याकडे अखिल भारतीय इंटक काँग्रेसच्या राष्ट्रीय सचिव पदासह महाराष्ट्र प्रदेश इंटक काँग्रेसचे कार्याध्यक्ष, पुणे जिल्हा इंटक काँग्रेस जिल्हाध्यक्ष पदांचे देखील अधिकार आहेत. शिवाय काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष पद देखील त्यांच्याकडे आहे.

## संपादकीय

# माणूस म्हणून जगायचा ध्यास घेतलेला माणूस...

***बाबा आमटे गेले त्यानंतर साधना साप्ताहिकात कुमार शिराळकरांनी लेख लिहिला होता. बाबांनी माणूस म्हणून जगायचा ध्यास घेतला होता, असं लिहिलं होतं.***

"श्रमातून वस्तूंची निर्मिती-नवनिर्मिती करणं, आणि स्वतःच्या प्रतिभेतून भवितव्याला साकार करण्याचा प्रयत्न करणं म्हणजे माणूस म्हणून जगणं," असं त्यांनी लिहिलं आहे. बाबा आमटेंनी सोमनाथला श्रमिक विद्यापीठ काढलं, त्या विद्यापीठाच्या पहिल्या बॅचमधला कुमार शिराळकर हा एक विद्यार्थी. माणूस म्हणून जगायचा ध्यास घेतलेल्या या माणसाने २ ऑक्टोबरला आपल्या जीवनाला पूर्णविराम दिला. ते गेली तीनेक वर्षं कॅन्सरने आजारी होते. गेल्या दोनेक महिन्यांत हा आजार बळावला. आता या आजारातून कुमार बाहेर येणार नाही, हे कळून चुकलं होतं. आता किती दिवस, एवढाच प्रश्न होता. पण हा प्रवास इतक्यात संपेल, असं वाटत नव्हतं. वाटलं, तरी ते स्वीकारायला मन तयार होत नव्हतं. आणि अखेर २ ऑक्टोबरला ८० वर्षांच्या देहाने ही जीवनयात्रा संपवली. मार्क्सवादी कार्यकर्ता, संत कम्युनिस्ट, शोषित-वंचित समूहांचा, विशेषतः आदिवासी आणि भूमिहीनांचा आवाज म्हणून उभा महाराष्ट्र त्यांना ओळखतो. कुमार शिराळकर संघर्षशील राजकीय कार्यकर्ता होतेच, त्याबरोबर ते कृतिशील विचारवंत होते. या कृतिशील विचारवंताची वैचारिक मूस घडली ती सत्तरच्या दशकात. सत्तरच्या अस्वस्थ दशकातल्या अनेक परिवर्तनवादी चळवळींमध्ये, प्रयोगांमध्ये कुमार शिराळकर अग्रक्रमाने सहभागी होते. शहादा परिसरात जमीनदारांकडून होत असलेल्या शोषणाविरोधात तेथील आदिवासींची अंबरसिंग महाराजांच्या नेतृत्वाखाली लढाई सुरू होती. आयआयटीमधून सुवर्णपदक मिळवून पदवीधर झालेल्या कुमार शिराळकरांनी आधी सोमनाथचे श्रमिक विद्यापीठ, आणि तिथून बाबांच्या सांगण्यानुसार दिनानाथ मनोहर आणि इतर साथीदारांसह थेट शहादा गाठले. अंबरसिंग महाराजांबरोबर चळवळीत भाग घेतला. अंबरसिंग महाराजांच्या मृत्यूनंतर ही चळवळ टिकवून ठेवण्याचे, अधिक व्यापक आणि सशक्त करण्याचे काम केले. याच काळात पुण्या-मुंबईकडचे सुशिक्षित तरुणही या चळवळीत सहभागी झाले होते. आणीबाणीच्या अलीकडे पलीकडे यातले अनेक साथीदार शहाद्यातून बाहेर पडले. पण कुमार शिराळकर कायमचेच तिथले झाले. श्रमिक संघटना आणि १९८२ पासून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या झेंड्याखाली आदिवासींची, कष्टकऱ्यांची जगण्याची लढाई लढत राहिले. आजही शहादा-तळोदा परिसरात, अक्कलकुवा-धडगावसारख्या सातपुड्याच्या कुशीत विसावलेल्या भागातल्या पाड्यापाड्यांत ते कुमारभाऊ म्हणून ओळखले जातात.

# विद्यार्थ्यांना मिळणार रोजगाराची संधी







नामपूर (जि. नाशिक) : शिक्षण आणि रोजगाराच्या संधी यांचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे राज्यात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या लाखोंच्या घरात आहे. त्यामुळे विद्यार्थीदशेत मुलांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार राज्यातील बारावीच्या १५ हजार विद्यार्थ्यांना शिक्षण व रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

यासाठी राज्य शासनाने टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस सोबत नुकताच सामंजस्य करार केला असून, यासाठीच्या नोंदणीचा श्रीगणेशा १ तारखेपासून पासून झाला आहे. ग्रामीण भागातील गरजू, होतकरू विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा, अशी शासनाला अपेक्षा आहे.आपलं शरीर कृत्रिम रसायने पचवायला उत्क्रांत झालं आहे का? डीडीटीचा शोध लावणाऱ्या जर्मन शास्त्रज्ञाला नोबेल पारितोषीक मिळालं, पण त्यानंतर काही वर्षांनी रेचल कार्लसन या अमेरिकन शास्त्रज्ञाने हे विष बायो मॅग्निफिकेशन होऊन अन्नसाखळीतील सर्व जिवांच्या शरीरात पोहोचत आहे हे दाखवून जगाला धक्का दिला आणि मग डीडीटीवर बंदी आली. मानवी आरोग्य, आरोग्य सेवा आणि निसर्ग यांच्यावर या उपलब्ध अन्नाचा आणि अन्न प्रक्रियेचा गंभीर परिणाम होत आहे. कॅन्सर, हायपर टेन्शन, हृदय रोग, डायबिटीस, लठ्ठपणा यासारख्या भयानक आजाराचे प्रमाण वाढले आहे. अशा प्रकारे वैयक्तिक, सामाजिक आणि नैसर्गिक स्तरावर सध्याच्या प्रक्रिया करून बनवलेल्या अन्न साखळीचा परिणाम होत आहे.

टाटा इन्स्टिट्यूटच्या वतीने स्कूल ऑफ व्होकेशनल एज्युकेशनच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या करारानुसार या अभ्यासक्रमासाठी HTTPS://ADMISSIONS.TISS.EDU या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार असून, डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत प्रवेशाची अंतिम तारीख असेल.

जानेवारी २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात प्रत्यक्ष अभ्यासक्रमाची सुरूवात होणार आहे. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेमवर्क आधारित प्रमाणपत्र देण्यात येईल. यामध्ये पहिल्या वर्षानंतर डिप्लोमा कोर्स, दुसऱ्या वर्षानंतर ॲडव्हान्स डिप्लोमा कोर्स तर तिसऱ्या वर्षानंतर बॅचलर इन व्होकेशनल एज्युकेशन हे प्रमाणपत्र मिळेल.

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस या नामांकित मानद विश्वविद्यालय संस्थेच्या 'स्कुल ऑफ व्होकेशनल एज्युकेशन' या विभागाद्वारे युजीसी निकषानुसार पदविका व पदवी प्राप्त करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी 'कमवा व शिका' या तत्वावर कोणत्याही शाखेचा विद्यार्थी बारावीनंतर प्रवेश घेऊ शकेल. या संस्थेने अभ्यासक्रमाकरीता ३ हजार ७५० उद्योगांसोबत करार केला असून, विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावर त्यांच्या आवडीनुसार विषय अथवा जॉबरोल निवडण्याची सोय उपलब्ध असणार आहे.

समग्र शिक्षा कार्यालयाने जागतिक बँक पुरस्कृत 'स्टार्स' प्रकल्पांतर्गत 'मिलाप' (MAHARASHTRA YOUNG LEADERS ASPIRATIONS DEVELOPMENT PROGRAMME) हा कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना करिअरच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. या नोंदणीसाठी HTTPS://REGISTRATIONS.HCLTECHBEE.COM/ हे संकेतस्थळ उपलब्ध आहे. आतापर्यंत ३४ हजार विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमासाठी नोंदणी केली आहे.

# इटलीही उजव्या वळणावर!

**दुसऱ्या महायुद्धानंतरचे सर्वाधिक उजव्या विचारसरणीचे सरकार इटलीत सत्तेवर येईल, असे भाकीत गतसप्ताहातच वर्तवण्यात आले होते.**

दुसऱ्या महायुद्धानंतरचे सर्वाधिक उजव्या विचारसरणीचे सरकार इटलीत सत्तेवर येईल, असे भाकीत गतसप्ताहातच वर्तवण्यात आले होते. परंतु जॉर्जिया मेलोनी यांच्या 'ब्रदर्स ऑफ इटली'प्रणीत आघाडीला इतके घसघशीत बहुमत मिळेल, याचे आडाखे कुणीही बांधले नव्हते. इटलीतील गेल्या काही महिन्यांतील राजकीय अनिश्चिततेला कंटाळलेल्या मतदारांनी काहीएक नेमकी आणि निश्चित भूमिका मांडणाऱ्या आघाडीच्या पारडय़ात भरभरून मते दिली आहेत. राष्ट्रकेंद्री आणि धर्मकेंद्री राजकारणाचे वारे युरोपात वाहू लागल्याचे संकेत आजचे नाहीत. त्याची पहिली ठळक सुरुवात ब्रेग्झिटपासून झाली असे म्हणता येईल. आमच्या राष्ट्राचे आम्हीच भाग्यविधाते, या भावनेतून युरोपीय ऐक्याचे धागेच उसवण्याची मोहीम सुरू झाली आहे. आमच्या राष्ट्रात आम्ही मानू तोच धर्म, आम्ही ठरवू तेच धोरण या भूमिकेस सातत्याने प्राधान्य दिले




जाऊ लागल्यामुळे, एक जबाबदार खंड ही युरोपची राजकीय ओळख काहीशी डागाळू लागलेली आहे. ब्रदर्स ऑफ इटली पक्षाच्या जॉर्जिया मेलोनी या इटलीच्या पहिल्या पंतप्रधान होतील. त्यांच्या केवळ दहा वर्षे आयुर्मान असलेल्या पक्षाला जवळपास २६ टक्के मतदारांनी मतदान केले, याचे एक कारण नकारात्मक मतदान हेही असल्याचे विश्लेषक सांगतात. इटलीत सार्वत्रिक निवडणुकीत ६४ टक्के मतदारांनीच रस दाखवला. कारण गेल्या दहा वर्षांच्या अनिश्चित आणि भ्रष्ट राजकारणाला विशेषत: इटालियन युवा मतदार विटले होते. मावळते पंतप्रधान मारियो ड्रागी यांच्या नॅशनल युनिटी आघाडी सरकारमध्ये मेलोनी यांचा पक्ष सहभागी नव्हता. त्यामुळे सरकारविरोधी रोषाची झळ त्यांच्या पक्षाला पोहोचली नाही. इटली हा युरोपीय समुदायाचा संस्थापक देश आणि जर्मनी, फ्रान्स यांच्या पाठोपाठ युरोपातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था. परंतु युरोपीय समुदायाच्या स्थैर्य आणि उत्थानाविषयी जर्मन आणि फ्रेंच राज्यकर्त्यांच्या ठायी दिसून आलेला परिपक्वपणा इटालियन राज्यकर्त्यांनी दाखवला नाही हे वास्तव आहे. मेलोनी यांच्या पक्षाची धोरणे स्थलांतरितविरोधी, विभाजनवादी, युरोभावनेची खिल्ली उडवणारी, इटलीस प्राधान्य देणारी वगैरे होती. परंतु सत्तेवर आल्यानंतर त्यांच्या पक्षाला आणि आघाडीलाही वास्तवाचे चटके बसणार हे उघड आहे. कारण मेलोनी यांच्यासारख्या राज्यकर्त्यांना भावनेवर स्वार होऊन सत्तारूढ होणे फारसे अवघड नसते. पण भावना आणि आत्मकेंद्रित धोरणांवर राज्यशकट हाकता येत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### निवडणूक आयोगाने ‘धनुष्यबाण’ चिन्ह गोठवलं;



। मुंबई । महाईन्यूज ।

गेल्या काही दिवसांपासून ‘धनुष्यबाण’ चिन्हाबाबत सुरू असलेला वाद अखेर संपुष्टात आला आहे. आज निवडणूक आयोगाचा याबाबत मोठा निर्णय घेत ‘धनुष्यबाण’ चिन्ह गोठावण्याचा निर्णय घेतला आहे. शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरेंसाठी हा मोठा धक्का मानला जातो आहे. निवडणूक आयोगाने काय म्हटले?

दोन्ही गटाला ‘धनुष्यबाण’ चिन्ह वापरता येणार नाही. तसेच दोन्ही गटाला शिवसेना हे नावही वापरता येणार नाही. मात्र, दोन्ही दोन्ही गटाला ठाकरे गट आणि शिंदे गट अशी नावे वापरता येऊ शकतात. अंधेरी पोटनिवडणुकीसाठी दोन्ही गटाला वेगळे चिन्ह देण्यात येईल, असेही निवडणूक आयोगायाने म्हटले आहे.

# शिवसेना पक्षनावासह चिन्ह गोठवले!

## केंद्रीय निवडणूक आयोगाचा हंगामी निर्णय, उद्धव ठाकरे गटाला धक्का

। मुंबई । महाईन्यूज ।

शिवसेनेचे ‘धनुष्य-बाण’ हे निवडणूक चिन्ह गोठवण्याचा हंगामी आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने शनिवारी रात्री उशिरा जारी केला. या आदेशामुळे उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोन्ही गटांना अंधेरी-पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत शिवसेनेच्या चिन्हाचा वापर करता येणार नाही. आयोगाचा हा निर्णय ठाकरे गटासाठी धक्कादायक असून त्याविरोधात न्यायालयात दाद मागितली जाण्याची शक्यता आहे.शिवसेनेत आमदारांनी बंडखोरी केल्यानंतर सुरु झालेल्या लढाईला आता नवं वळण लागलं आहे. शिवसेनेच्या ‘धनुष्यबाण’ चिन्हासाठी दोन्ही गट निवडणूक आयोगाकडे गेले होते. ते चिन्हच आयोगानं गोठवलं आहे. त्यानंतर आता शिवसेनेचे आमदार आदित्य ठाकरे यांनी शिंदे गटावर हल्लाबोल केला आहे.




### ठाकरे गटाचा विरोधी युक्तिवाद

ठाकरे गटाने शनिवारी दुपारी १ वाजता ८०० पानांचे लेखी निवेदन सादर केले. अंधेरी-पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत शिंदे गट उमेदवार उभा करणार नसल्याने निवडणूक चिन्हावर तातडीने निर्णय घेण्याची गरज नाही. शिंदे गटाने निवडणूक आयोगाकडे केलेला अर्ज केवळ भाजपला राजकीय लाभ मिळवून देण्यासाठी केलेला आहे. त्यामुळे दोन्ही गटांची कागदपत्रे तपासून अंतिम निर्णय घेतला जावा, तोपर्यंत निवडणूक चिन्ह गोठवले जाऊ नये, असा युक्तिवाद ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आला.

ठाकरे आणि शिंदे गटाने आयोगाकडे हजारो कागदपत्रे सादर केली असल्यामुळे त्यांची छाननी केल्याशिवाय अंतिम निर्णय देता येणार नाही. मात्र, अंधेरी-पूर्व विधानसभा मतदारसंघामध्ये पोटनिवडणूक जाहीर झाली असल्याने त्वरित हंगामी निर्णय जाहीर केला जात आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगानं अंधेरी-पूर्व पोटनिवडणुकीसाठी तात्पुरत्या स्वरुपात ‘धनुष्यबाण’ चिन्ह गोठवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, ‘शिवसेना’ हे नावही उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेंना वापरता येणार नाही आहे. त्यावरुन आदित्य ठाकरेंनी ‘खोकेवाल्या गद्दारांनी’ म्हणत बंडखोर गटावर टीका केली आहे.

### “ईडी, सीबीआयनंतर आयोगही बेठबिगार

तर, शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनीही निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. “सरकारच्या स्वायंत्त संस्था ईडी, सीबीआयनंतर निवडणूक आयोगही बेठबिगार झाला आहे. कोणी तरी तक्रार केली, याची छाणणी न करता निवडणूक आयोगाने चार तासात आदेश दिला आहे. कोणाच्या आदेशानुसार हे सर्व सुरु आहे. देश हुकूमशाहीकडे चालला आहे,” असे अरविंद सावंत यांनी म्हटलं.

# चेंबूरच्या टिळक नगरमधील इमारतीला भीषण आग

### धुरापासून बचाव करण्यासाठी काही रहिवासी खिडकीच्या ग्रीलमध्ये बसले होते

। मुंबई । । महाईन्यूज ।

.चेंबूरच्या टिळक नगर परिसरात शनिवारी दुपारी ३ च्या सुमारास ‘नवीन टिळक नगर’ या १४ मजली इमारतीला भीषण आग लागली.

या इमारतीमध्ये अनेक रहिवासी अडकले असून आगीचे वृत्त समजताच टिळक नगर पोलीस आणि अग्निशमन दलाचे १२ ते १५ बंब घटनास्थळी रवाना झाले.

आगीमुळे इमारतीमध्ये धुराचे साम्राज्य पसरले असून धुरापासून बचाव करण्यासाठी काही रहिवासी खिडकीच्या ग्रीलमध्ये बसले होते. अग्निशमनाबरोबरच दुर्घटनाग्रस्त इमारतीमधून रहिवाशांना बाहेर काढण्याचे काम अग्निशमन दलाने युद्धपातळीवर हाती घेतले होते. आग नेमकी कशामुळे लागली याचे नेमके कारण समजू शकले नाही.



अग्निशमनाबरोबरच दुर्घटनाग्रस्त इमारतीमधून रहिवाशांना बाहेर काढण्याचे काम अग्निशमन दलाने युद्धपातळीवर हाती घेतले होते. आग नेमकी कशामुळे लागली याचे नेमके कारण समजू शकले नाही.

# दहीहंडी फोडताना जखमी झालेल्या प्रथमेशची मृत्युशी झुंज संपली!

## केईएम रुग्णालयात शनिवारी निधन

। मुंबई । महाईन्यूज ।



घाटकोपर परिसरात दहीहंडी फोडण्यासाठी रचलेले थर कोसळून गंभीर जखमी झालेला गोविंदा प्रथमेश सावंतचे शनिवारी केईएम रुग्णालयात हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. तो २० वर्षांचा होता. साधारण दीड महिन्यांहून अधिक काळ त्याची रुग्णालयात मृत्युशी झुंज सुरू होती. अखेर शनिवारी त्याची प्राणज्योत मालवली. प्रथमेशच्या मृत्युमुळे करीरोड परिसरात शोककळा पसरली. राज्य सरकारने करोनाविषयक निर्बंध हटविले असून यंदा सर्वच उत्सव निर्बंधमुक्त वातावरणात साजरे होत आहेत. यामुळे दहीहंडीच्या दिवशीही गोविंदांमध्ये प्रचंड उत्साह होता. अनेक दहीहंडी पथकांतील गोविंदांमध्ये उंच दहीहंडी फोडण्याची चुरस लागली होती. दहिकाल्याच्या दिवशी १९ ऑगस्ट रोजी करीरोड येथील साईभक्त गोविंदा पथक घाटकोपर येथे दहीहंडी फोडण्यासाठी गेले होते. घाटकोपरमध्ये दहीहंडी फोडण्यासाठी रचलेला थर कोसळला आणि थरात उभा असलेला प्रथमेश गंभीर जखमी झाला.

तातडीने प्रथमेश रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या मणक्याला गंभीर दुखापत झाली होती. तेव्हापासून ते रुग्णालयात मृत्युशी झुंज देत होता. अखेर शनिवारी त्याची प्राणज्योत मालवली. रुग्णालयात दाखल असताना साईभक्त गोविंदा पथकातील काही युवक त्याची सुश्रुशा करीत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याच्यावरील उपचारासाठी पाच लाख रुपये मदत म्हणून दिले होते. तसेच माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांचे डॉक्टर प्रथमेशच्या प्रकृतीवर लक्ष ठेऊन होते. काही गोविंदा पथकांनीही त्याला आर्थिक मदत केली होती.

# जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ल्याचा कट फसला!

## स्टिकी बॉम्बचा साठ्यासह 1 दहशतवाद्याला अटक

**। राजस्थान । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**जम्मू काश्मीर: जम्मू पोलिसांना जेईएमचे मोठे दहशतवादी मॉड्यूल उद्ध्वस्त उधळून लावण्यात यश आले आहे. कठुआ जिल्ह्यातील बिल्लावर परिसरातून सुरक्षा दलांनी स्टिकी बॉम्ब आणि आयईडीची मोठा साठा जप्त केला आहे. तसेच एका दहशतवाद्याला अटक करण्यात आली आहे. सध्या परिसरात सर्च ऑपरेशन सुरू आहे.**



2 ऑक्टोबर रोजी सुरक्षा दलांनी जेईएमचा दहशतवादी झाकीर हुसैन उर्फ झुबेर याला अटक केली होती. त्याचवेळी बिल्लावार परिसरातून 3 स्टिकी बॉम्ब आणि 3 आयईडी साठा जप्त केला होता. यामुळे जम्मूमध्ये जैश-ए-मोहम्मदचा दहशत माजवण्याचा प्रयत्न पोलिसांना हाणून पाडण्यात यश आलं आहे. विशेष म्हणजे जम्मू-काश्मीर पोलिसांनी झाकीर हुसैन उर्फ झुबेर याच्यासह कठुआ येथून 20000 रुपये रोख आणि 1 स्टिकी बॉम्ब साठा जप्त केला. हा त्याच मॉड्यूलचा एक भाग आहे. दहशतवाद्यांचे मोठे रॅकेट उद्धस्त

पूंछ जिल्ह्यातही अलीकडे पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांनी दहशतवाद्यांचे मोठे नेटवर्क उद्ध्वस्त केले. पोलिसांनी एका महिलेसह 6 जणांना अटक केली होती. पोलिसांनी महिलेच्या ठिकाणाहून सुमारे 3 किलो आयईडी साठा जप्त केला आहे. हा आयईडी साठा पाकिस्तानी गुप्तचर संस्थेने पाकिस्तानी लष्कराच्या मदतीने सीमेपलीकडून त्याच्याकडे पोहचवण्यात आला होता.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव 'जैतून अख्तर' असे असून ती पुंछ येथील रहिवासी आहे. महिलेने पोलिसांना सांगितले की, ज्यांचे नातेवाईक पीओकेमध्ये राहतात अशा काश्मीरमधील लोकांना पाकिस्तानी गुप्तचर संस्था लक्ष्य करत आहेत, तसेच तिच्या पतीचे मामा सीमेपलीकडील लष्कराचे एरिया कमांडर आहेत, ज्याचे नाव टिक्का खान आहे. ते पाकव्याप्त काश्मीरमधील रावळकोट भागात राहतात.

# खर्गे विरुद्ध थरूर!

## काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मुंबईतून कोणाला किती मते मिळणार?

**। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी चुरस वाढली असून मल्लिकार्जून खर्गे आणि शशी थरुर यांच्यात मुख्य लढत होणार आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी आजची शेवटची तारीख होती. त्यानुसार, अध्यक्षपदासाठी मल्लिकार्जून खर्गे आणि शशी थरुर एकमेकांविरोधात लढणार आहेत. मल्लिकार्जून खर्गे यांना सर्वाधिक पाठिंबा मिळण्याची शक्यता असताना त्यांच्यासाठी मुंबईतून मिळणारी मते फुटण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

काँग्रेसच्या अध्यक्षपदाची गेल्या अनेक महिन्यांपासून चर्चा आहे. राहुल गांधी यांनी पुढील अध्यक्ष व्हावं अशी मागणी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गहलोत यांच्यासह अनेक नेत्यांनी केली होती. मात्र, २०१९ च्या निवडणुकीत हार पत्कारल्याने राहुल गांधी यांनी अध्यक्षपदासाठी विरोध केला होता. त्यामुळे अशोक गहलोत यांचं नाव चर्चेत होतं. मात्र, त्यांच्या उमेदवारीने राजस्थानत सत्तासंघर्ष निर्माण झाला. त्यामुळे सोनिया गांधी यांच्याशी चर्चा करून अशोक गहलोत यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. त्यानंतर, राज्यसभेचे विरोधीपक्ष नेते मल्लिकार्जून खर्गे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतरस लागलीच, खासदार शशी थरुर यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

८ ऑक्टोबर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख होती. त्यामुळे, काँग्रेसच्या अध्यक्षपदाची खरी लढत आता मल्लिकार्जून खर्गे आणि शशी थरूर यांच्यातच होणार आहे. हे दोनच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याने निवडणुकीकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे. महाराष्ट्रातून एकूण ४०० मते असून त्यापैकी २०० मते मुंबईतून मिळणार आहेत. मात्र, २०० पैकी १०० पेक्षा जास्त मते शशी थरुर यांना मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येतेय. त्यामुळे मुंबईतील किती मते शशी थरुर आणि मल्लिकार्जून खर्गेंना जातात हे पाहावं लागणार आहे. दरम्यान, ही लढत या दोघांमधील असली तरीही सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचा मात्र मल्लिकार्जून खर्गे यांनाच पाठिंबा आहे.

# 'दिवाळीला सोने लकाकणार, चांदीही महागणार !

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

दसऱ्याच्या दिवशी अभूतपूर्व सोने खरेदी झाल्यानंतर आता सोन्याच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. दिवाळीपर्यंत सोन्याच्या किंमती ५३ हजार रुपये प्रति दहा ग्रॅम जाऊ शकते. त्यामुळे धनत्रयोदशीला गुंतवणूकदार सोनेखरेदीमध्ये किती गुंतवणूक करतात हे पाहावं लागेल. दरम्यान, चांदीच्या किंमतीतही वाढ होण्याची शक्यता आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती झपाट्याने वाढत आहेत. तसंच, सोने-चांदीच्या किंमतीही वाढत आहेत. गेल्या महिन्यात सोन्याच्या किंमती कमी झाल्या होत्या होत्या. २४ कॅरेट सोनं ५० हजाराच्या आत आले होते. तर, २२ कॅरेट सोन्याची किंमत ४५ हजारापर्यंत पोहोचली होती. मात्र, गेल्या आठवड्यापासून सोनाच्या किंमतीही वाढू लागल्या आहेत. दुसरीकडे डॉलरची किंमतही मजबूत होत आहे. त्यामुळे येत्या दिवाळीपर्यंत सोन्या-चांदीच्या किंमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. दिवाळीपर्यंत सोन्याचा दर प्रति तोळा ५३ हजार रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. तर, चांदीचा भाव ६३ हजार प्रति किलो होण्याची शक्यता आहे.



# काय तो वाहता ओढा, काय तो पूर !

## शहाजीबापूंच्या मतदारसंघात विद्यार्थ्यांचा पाण्यातून जीवघेणा प्रवास

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

राज्याच्या राजकारणातील सत्तापरिवर्तनात सोलापूर जिल्ह्यातील सांगोला विधानसभा मतदारसंघातील शिंदे गटाचे आमदार शहाजीबापू पाटील प्रसिद्धी झोतात आले. गुवाहाटीमध्ये असताना काय झाडी, काय डोंगर, काय हाटील या त्यांच्या डायलॉगची देशभर चर्चा झाली. ज्यामुळे शहाजीबापू पाटील हा अनेकांसाठी ओळखीचा चेहरा झाले आहेत. एकीकडे शहाजीबापूंच्या डायलॉगची चर्चा होतेय तर दुसरीकडे आता त्यांच्या मतदारसंघातील नागरिकांच्या अडचणी, प्रश्न समोर येत आहेत. यावरून विरोधकांनी शहाजीबापू भाषणबाजी करण्यापेक्षा



मतदारसंघातील प्रश्नांकडे लक्ष द्या अशी टीका होत आहे. तालुक्यातील दक्षिण भागातील जुजारपूर येथील ओढा दर पावसाळ्यात ओसंडून वाहतो. यामुळे शेतकरी, ग्रामस्थ, विद्यार्थी यांना पाण्यातून धोकादायक परिस्थितीत प्रवास करावा लागतो. यावर्षी देखील ओढ्याला पूर आला आहे. या ओढ्यावरील पूल जमीन पातळीवर असल्याने हा पूल पावसाळ्यात कायम पाण्याखाली असतो. यामुळे जुजारपूर जुनोनी या रस्त्यावरून धोकादायक पद्धतीने वाहतूक करावी लागते. यात पाटील वस्तीत जाणारा मार्गावर पुलचं नसल्याने प्रवाश्यांना जीवघेणा प्रवास करावा लागतो. या ठिकाणी उंच पूल बांधल्यास पावसाळ्याचे चार महिने या परिसरातील ग्रामस्थांची होणारी अडचण कायमची दूर होणार आहे. मात्र या परिस्थितीकडे आमदार शहाजीबापू पाटील यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शिवसेना नेते लक्ष्मण हाके यांनी दिली आहे. विषेश म्हणजे जुजारपूरम हे गाव शहाजीबापू पाटील यांच्यामागे कायम खंबीरपणे उभे राहिल्याचे मतदानातून दिसून येते. मात्र आपल्याचा मतदारांच्या प्रश्नाकडे ते लक्ष देत नसल्याची टीका लक्ष्मण हाके यांनी केली आहे. दरम्यान नागरिकांसह शाळकरी मुलांना देखील या पाण्यातून दररोज जीवघेणा प्रवास करावा लागतो. त्यामुळे भाषणबाजी करण्यापेक्षा शहाजीबापू पाटील यांनी मतदारसंघातील प्रश्नाकडे लक्ष द्या अशी टीका विरोधक करत आहेत. दरम्यान विरोधकांच्या टीकेनंतर आमदार शहाजी पाटील आपल्या मतदारसंघातील प्रश्नाकडे लक्ष देणार का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# सामान्य स्त्रीच्या जिद्दीची कथा सांगणारा ‘हवाहवाई’

स्त्री म्हटले की संघर्ष हा आलाच आणि कोणताही संघर्ष करताना स्त्रिया कमी पडत नाहीत. आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी स्त्रिया मोठमोठ्या कंपनीतही नोकरी करतात आणि प्रसंगी रस्त्यावर फूड स्टॉलही चालवतात. याच फूड स्टॉल चालवणाऱ्या महिलांची कथा ‘हवाहवाई’ या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर आली आहे. ‘द ग्रेट इंडियन किचन’ या बहुचर्चित मल्याळम चित्रपटातील अभिनेत्री निमिषा संजयनने ‘हवाहवाई’ या चित्रपटातून मराठीत पदार्पण केले असून या चित्रपटात वर्षा उसगावकर, सिद्धार्थ जाधव, समीर चौघुले अशा दमदार कलाकारांची फौज आहे. ‘मराठी तारका प्रॉडक्शन्स’चे महेश टिळेकर आणि ‘नाइनटिन नाइन प्रॉडक्शन्स’चे विजय शिंदे यांनी चित्रपटाची निर्मिती केली असून महेश टिळेकरांनीच चित्रपटाच्या लेखनाची, दिग्दर्शनाची आणि संकलनाची धुरा सांभाळली आहे. ‘हवाहवाई’ चित्रपटाबद्दल महेश टिळेकर, वर्षा ऊसगावकर, समीर चौघुले आणि विजय शिंदे यांनी ‘लोकसत्ता’शी गप्पा मारल्या.



### त्या’ काकूंमुळे चित्रपटाची निर्मिती

या चित्रपटाची निर्मिती कशी झाली याबद्दल सांगताना महेश टिळेकर म्हणाले की, मला खाण्याची प्रचंड आवड असल्यामुळे पुण्यात कोणत्या गल्लीत काय खायला मिळते याची माहिती काढून आवर्जून त्या ठिकाणी मी खायला जातो. मी पूर्वी हडपसरवरून पुण्यात डब्बे पोहोचवायचो. डब्बे करणाऱ्या चौघुलेकाकू मला डब्बे पोहोचवण्याचे दोन रुपये द्यायच्या, पण बसचे तिकीट तीन रुपये असल्याने जेवणासाठी पैसे वाचावेत म्हणून मी पायी प्रवास करायचो. त्यावेळी चौघुलेकाकूंचे डब्बे बनवण्यासाठीचे कष्ट मी माझ्या डोळय़ांनी पाहात होतो. त्यानंतर पुढे मी अनेक स्त्रियांना भेटलो ज्या फूड स्टॉल चालवत आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मग एक गोष्ट प्रकर्षांने जाणवली ती म्हणजे आपण फक्त त्यांच्या स्टॉलवर जाऊन खातो, पण त्यांचे कष्ट पाहात नाही. फूड स्टॉलवर स्वच्छ आणि घरगुती जेवण मिळते पण त्याबदल्यात आपण त्या स्त्रियांना सन्मान देतो का?, हा विचार मनात होता. यावर चित्रपट काढावा असे अनेक वर्षांपासून मनात होते आणि ते प्रत्यक्षात साकारण्यासाठी मला माझ्या मित्राची विजय शिंदेची साथ लाभली आणि ‘हवाहवाई’ चित्रपटाची निर्मिती झाली, असे त्यांनी सांगितले.

### ‘हवाहवाई’ चित्रपट म्हणजे श्रीदेवीला मानवंदना

‘हवाहवाई’ हा शब्द आठवला की डोळय़ांसमोर श्रीदेवी उभ्या राहतात. या चित्रपटाच्या नावाबद्दल टिळेकरांनी एक किस्सा सांगितला. मराठी तारकांच्या एका कार्यक्रमाला श्रीदेवींना बोलावले असता अंधेरी ते यशवंतराव चव्हाण सेंटर असा दोन तासंचा प्रवास करून त्या कार्यक्रमाला आल्या. निघताना लिफ्टजवळ अचानक त्यांच्या पाठीत कळ आल्याने त्या थांबल्या. यावर मी त्यांना पाठीत दुखत असतानाही तुम्ही का आलात?, असं विचारलं त्यावर त्या मी तुम्हाला शब्द दिला होता येईन आणि म्हणून मी आले असं म्हणाल्या. त्या क्षणीच मी त्यांचा आणखी मोठा चाहता झालो आणि त्यांना मानवंदना देण्यासाठीच खऱ्या अर्थाने या चित्रपटाचे नाव ‘हवाहवाई’ ठेवल्याचे त्यांनी सांगितले.

### आशाताई भूमिका साकारणार होत्या, मात्र..

या चित्रपटात आधी मुक्ता बर्वे आणि ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले भूमिका साकारणार होत्या. मात्र, करोनामुळे आशाताईंना घरातून बाहेर पडणे अशक्य झाले आणि मुक्ताला ही भूमिका काही कारणास्तव साकारता आली नाही, अशी माहिती टिळेकर यांनी दिली.

### मला कणा असलेली भूमिका हवी होती

वर्षा उसगावकर यांनी चित्रपटातील त्यांच्या भूमिकेबद्दल सांगताना असे म्हटले की, ‘मला महेश यांनी एक उत्तम पात्र दिले आणि त्यात जीव ओतण्याचा, अस्सलपणे साकारण्याचा मी पुरेपूर प्रयत्न केला आहे. मला कणा असलेली भूमिका हवी होती’.


### ..आणि अमिताभ बच्चन माझ्या पाया पडले

मनोरंजन क्षेत्रात असल्यामुळे कोणाच्याही ओळखीने अमिताभ बच्चन यांना भेटू शकलो असतो, पण आमच्या नशिबात एक वेगळीच घटना घड़ली. टाळेबंदीच्या काळात इतरांप्रमाणे महानायक अमिताभ बच्चनही ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ पाहात होते असे आम्हाला समजले आणि ‘सोनी मराठी’च्या प्रमुखांमुळे आम्हाला त्यांना भेटण्याची संधी मिळाली. त्यांना भेटायला गेलो असता मी त्यांना म्हणालो, मला आधी तुमच्या पाया पडू द्या..त्यावर मलाच तुमच्या पाया पडू द्या.. असे म्हणत ते माझ्या पाया पडले, हा क्षण अविस्मरणीय असल्याचे अभिनेते समीर चौघुले यांनी सांगितले.

सामान्य स्त्रीचा असामान्य प्रवास ‘हवाहवाई’ या चित्रपटात मांडण्याचा उत्तम प्रयत्न केला आहे. गृहिणींना गृहीत धरले जाते, पण त्याही पलीकडे ती एक सक्षम स्त्री असते हे दाखवणारा हा चित्रपट आवर्जून पाहा, असे आवाहन करत त्यांनी गप्पांचा समारोप केला.

## ‘हर हर महादेव’ चित्रपटात सायली संजीवची वर्णी

बहुचर्चित ‘हर हर महादेव’ चित्रपट दिवाळीच्या मुहुर्तावर येत्या २५ ऑक्टोबरला सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. झी स्टुडीओची निर्मिती असलेल्या या चित्रपटात तगडी स्टारकास्ट असणार आहे. मराठीतील सुप्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारताना दिसणार आहे. आता चित्रपटात आणखी एका मराठमोळ्या अभिनेत्रीची वर्णी लागली आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील लाडकी अभिनेत्री सायली संजीव चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत आहे. छत्रपती शिवाजी महाराज



यांच्या पत्नी ‘महाराणी सईबाई भोसले’ यांची भूमिका सायली साकारणार आहे. सायलीने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून चित्रपटातील तिच्या फर्स्ट लूकचे पोस्टर शेअर केले आहे. यानिमित्ताने सायली पहिल्यांदाच ऐतिहासिक भूमिका साकारताना दिसणार आहे. हर हर महादेव’ चित्रपटातील महाराणी सईबाईंच्या लूकमधील पोस्टर शेअर करत सायलीने “मनातील दु:ख चेहऱ्यावर न दाखवता नेहमी स्मित हास्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाठिशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या त्यांच्या अर्धांगिनी ‘महाराणी सईबाई भोसले”, असं म्हटलं आहे. सुबोध भावे आणि सायलीसह अभिनेता शरद केळकर, अमृता खानविलकरही चित्रपटात प्रमुख भूमिका साकारताना दिसणार आहेत. शरद केळकर शूरवीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या भूमिकेत आहे.

## ‘नाटू नाटू’ गाण्याचा ऑस्करमध्ये डंका?


एस.एस.राजामौली दिग्दर्शित ‘आरआरआर’ या चित्रपटाची जादू केवळ भारतातच नाही तर जगात पाहायला मिळते आहे. चित्रपटगृहातून घसघशीत कमाई करणारा हा चित्रपट आता ऑस्करमध्ये जगभरातील इतर आंतरराष्ट्रीय चित्रपटांसोबत स्पर्धा करण्यासाठी सज्ज झाला आहे. अमेरिकेतील ‘व्हरायटी’ या आंतरराष्ट्रीय मासिकानुसार ‘आरआरआर’ चित्रपटातील गाणी ऑस्कर पुरस्कारांच्या प्रमुख श्रेणींमध्ये स्पर्धा करणार आहेत. या चित्रपटातील ‘नाटू नाटू’ या गाण्याचा सर्वोत्कृष्ट मूळ गाणे स्पर्धा विभागात समावेश करण्यात आला आहे. या विभागात मेल ब्रूक्स, बिली आयलीश, लेडी गागा, सेलेना गोमेझ, जॅझमिन सुलिव्हन आणि डायन वॉरेन यांच्या पाच गाण्यांबरोबर या गाण्याची स्पर्धा होऊ शकते, असे या साप्ताहिकाने नमूद केले आहे



दरम्यान, ‘आरआरआर’ हा चित्रपट ऑस्कर २०२३ साठी पाठवला जात असल्याची माहिती देण्यात आली होती. ऑस्करमधील १४ वेगवेगळय़ा विभागांसाठी चित्रपटाचे नाव देण्यात आले असून सर्वोत्कृष्ट मोशन पिक्चर- डी.वी.वी. दानय्या, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक – एस.एस. राजामौली, सर्वोत्कृष्ट मूळ पटकथा – व्ही. विजयेंद्र प्रसाद, सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून एन.टी. रामाराव ज्युनिअर आणि राम चरण, सर्वोत्कृष्ट साहाय्यक अभिनेत्रीसाठी आलिया भट्ट तर सर्वोत्कृष्ट साहाय्यक अभिनेता म्हणून अजय देवगण यांचा या विभागात समावेश करण्यात आला आहे.नाटू नाटू’ या गाण्याचे गीतकार चंद्रबोस असून राहुल सिपलीगुंज, काला भैरवा यांनी हे गाणे गायले आहे. तसेच, ‘आरआरआर’ चित्रपटातील गाणी दिग्गज संगीतकार एम. एम. कीरावानी यांनी संगीतबद्ध केली आहेत. लोकांना वेड लावणाऱ्या ‘नाटू नाटू’ या गाण्याने तर समाज माध्यमांवर धुमाकूळच घातला होता. राम चरण आणि ज्युनियर एनटीआर यांनी नृत्य केलेल्या या गाण्याच्या रिल्सही मोठ्या प्रमाणात केल्या गेल्या. भारतीयच नाही तर परदेशातील प्रेक्षकांनाही नाटू नाटू या गाण्यावर थिरकण्याचा मोह आवरला नव्हता.

## ‘हाऊसफुल 5’ लवकरच येणार प्रेक्षकांच्या भेटीला

‘हाऊसफुल ५’ लवकरच येणार प्रेक्षकांच्या भेटीला, अक्षय कुमार, रितेशसह चित्रपटात बॉलिवूड कलाकारांची फौज ‘हाऊसफुल ५’ लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार मुख्य भूमिकेत असलेला ‘हाऊसफुल’ या कॉमेडी चित्रपटाच्या सीरिजने प्रेक्षकांना वेड लावलं. २०१० साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचे सिक्वेलही प्रेक्षकांच्या तितकेच पसंतीस उतरले. ‘हाऊसफुल’ चित्रपटाप्रमाणेच इतर तीनही सिक्वेलह हीट ठरले होते.



आता लवकरच याचा पुढचा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. साजिद नाडियावालाने ‘हाऊसफुल’ चित्रपटाच्या सीरिजची निर्मिती केली आहे. ‘हाऊसफुल ५’ चित्रपटासाठी तयारी करत असल्याची माहिती ‘पिंकविला’ने दिली आहे. मीडिया रिपोर्टमुसार, ‘हाऊसफुल’ सीरिजमधील सगळे कलाकार ‘हाऊसफुल ५’मध्ये दिसण्याची शक्यता आहे. ‘हाऊसफुल ४’ चित्रपटाच्या प्रदर्शनापासूनच साजिद नाडियावाला या सीरिजच्या पुढच्या भागाचा विचार करत आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### हरमनप्रीत सलग दुसऱ्या वर्षी सर्वोत्तम हॉकीपटू



**।नवी दिल्ली। महाईन्यूज**

भारतीय हॉकी संघाचा बचावपटू हरमनप्रीत सिंगची सलग दुसऱ्या वर्षी ‘एफआयएच’ सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) शुक्रवारी या पुरस्काराची घोषणा केली. यावर्षी ‘एफआयएच’चा पुरस्कार मिळवणारा हरमनप्रीत तिसरा भारतीय खेळाडू ठरला. सलग दोन वर्षे सर्वोत्तम हॉकीपटूचा पुरस्कार पटकावणारा हरमनप्रीत चौथा खेळाडू आहे. यापूर्वी टेऊन डी नूएर (नेदरलँड्स), जेमी डायर (ऑस्ट्रेलिया) आणि आर्थर व्हॅन डोरेन (बेल्जियम) यांनी सलग दोन वर्षे हा पुरस्कार मिळविला होता.“हरमनप्रीत आधुनिक काळातील अव्वल हॉकीपटू आहे. तो उत्कृष्ट बचावपटू असून स्टिकमध्ये चेंडू खेळवत ठेवण्याचेही त्याच्यात कौशल्य आहे,” अशा शब्दांत ‘एफआयएच’ने हरमनप्रीतचे कौतुक केले आहे.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा : वैभवचे सलग दुसरे सुवर्णपदक!

## महाराष्ट्राने 2 दिवसांत 5 पदकांची कमाई करुन वर्चस्व राखले

**अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्रथमच समावेश करण्यात आलेल्या योगासन प्रकारात महाराष्ट्राने दोन दिवसांत पाच पदकांची कमाई करून आपले वर्चस्व राखले. शनिवारी वैभव श्रीरामने सलग दुसऱ्या सुवर्णपदकाची, तर छकुली सेलोकरने रौप्यपदकाची कमाई केली. या दोघांनी शुक्रवारीही सुवर्ण व रौप्य यश मिळविले होते. पूर्वाने



कांस्यपदक कमावले.

महाराष्ट्राने पदकतालिकेत तिसरे स्थान कायम राखले आहे. महाराष्ट्राच्या खात्यावर आता २८ सुवर्ण, २८ रौप्य आणि ५४ कांस्य अशी एकूण ११० पदके आहेत. योगासन स्पर्धा प्रकारात राष्ट्रीय खेळाडू वैभव श्रीरामे (१३६.५२ गुण) आणि छकुली सेलोकर (१२७.६८ गुण) यांनी सर्वोत्तम कामगिरी करताना महाराष्ट्राच्या पदकसंख्येत वाढ केली. वुशू स्पर्धेत महाराष्ट्राच्या श्रावणी कटकेने कांस्यपदक पटकावले. ज्युडो प्रकारात ५२ किलोखालील गटात स्नेहल खावरेने कांस्यपदक जिंकले. मल्लखांब प्रकाराच्या पुरुष विभागात आघाडीवर असणाऱ्या महाराष्ट्राच्या पुरुष संघाला अखेर रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. महाराष्ट्राचे १३१.५ गुण होते.

# आशिया चषक क्रिकेट स्पर्धा : भारतीय महिला संघाची बांगलादेशवर मात

## बांगलादेशवर 59 धावांनी मात

**।सिल्हेट । महाईन्यूज ।**



शफाली वर्मा (४४ चेंडूंत ५५ धावा) आणि स्मृती मानधना (३८ चेंडूंत ४७) या सलामी फलंदाजांच्या महत्त्वपूर्ण योगदानांच्या बळावर भारतीय संघाने शनिवारी महिलांच्या आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या सामन्यात यजमान बांगलादेशवर ५९ धावांनी मात केली. भारतीय संघाला गेल्या सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानकडून पराभव पत्करावा लागला होता. मात्र, सलग दुसऱ्या दिवशी सामना खेळणाऱ्या भारतीय संघाने बांगलादेशविरुद्ध कामगिरीत सुधारणा केली. या सामन्यात ५ बाद १५९ अशी धावसंख्या उभारल्यानंतर भारताने बांगलादेशला २० षटकांत ७ बाद १०० धावांवर रोखले. भारत : २० षटकांत ५ बाद १५९ (शफाली वर्मा ५५, स्मृती मानधना ४७; रुमाना अहमद ३/२७) विजयी वि. बांगलादेश : २० षटकांत ७ बाद १०० (निगार सुलताना ३६, फरगाना हक ३०; शफाली वर्मा २/१०, दीप्ती शर्मा २/१३).

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या राधिका आवटीला तलवारबाजीत सुवर्णपदक

गुजरात येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राची लेक राधिका आवटीला तलवारबाजीत सुवर्णपदक मिळाले. याआधी रुद्रपूर (उत्तराखंड) येथे झालेल्या ३१ व्या वरिष्ठ राष्ट्रीय तलवारबाजी अजिंक्यपद स्पर्धेत फॉइल प्रकारात सुवर्णपदक पटकावून कतार (दोहा) येथील फॉइल



ग्रँड प्रीक्स स्पर्धेसाठी तसेच ऑलिम्पिक पात्रता फेरीसाठी तिची निवड झाली होती. हे तिचे सलग चौथे सुवर्णपदक आहे.

सांगलीत असलेल्या राधिका प्रकाश आवटी हिने गुजरातमध्ये गांधीनगर येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत केरळकडून खेळताना तलवारबाजीत सुवर्णपदक पटकावले. राष्ट्रीय स्पर्धेतील हे सलग चौथे सुवर्णपदक ठरले आहे. अकिवाट (ता. शिरोळ) हे राधिकाचे मूळ गाव आहे. तिचे प्राथमिक शिक्षण कुपवाडमधील नवकृष्णा व्हॅली येथे झाले आहे. सध्या ती केरळ येथे ‘साई’ प्रशिक्षण केंद्रात सराव करीत आहे. कसून केलेल्या सरावाच्या जोरावर तिने तलवारबाजी स्पर्धेत मोठी मजल मारली. २०२० साली वरिष्ठ राष्ट्रीय तलवारबाजी अजिंक्यपद स्पर्धेत तिने सुवर्णपदक पटकावले होते.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही